महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. :औसंवि/ब/ककनिस/५६वी बैठक/ 28005 दिनांक : 08-10-2013

# परिपत्रक

विषय : म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना, ४ प्रमुख आजारांसाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाकरिता कंपनीकडून देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.

संदर्भ : १) तत्कालीन मंडळाचा ठराव क्र.७३७, दि. २४/०१/१९९१.
२) परिपत्रक क्र. औसंवि/ब/ककनिस/५६ वी बैठक/२३०८९, दि. १७/०८/२०१३.

********

म.रा.वि.मंडळ अंतर्गत कर्मचारी कल्याण निधी समितीची ५६वी बैठक दि. २८/०६/२०१३ रोजी प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांस **०४ प्रमुख आजार म्हणजेच १) मेंदूच्या गाठीची शस्त्रक्रिया (Brain tumor Surgery) २) कर्करोग (Cancer) ३) गंभीर अस्थीरोग शस्त्रक्रिया (Major Orthopedic Surgery) ४) हृदय शस्त्रक्रिया (Open Heart Surgery)** या आजारांकरिता पूर्वीच्या तरतूदीनुसार म.रा.वि.मंडळ क.क.निधीमधून रु.२०,०००/- व संबंधीत कंपनीकडून रु. १०,०००/- अशी एकूण रु. ३०,०००/- वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात येत होती त्यामध्ये वाढ करण्याबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

या आजारांकरीता कर्मचाऱ्यास होणारा प्रचंड खर्च विचारात घेता त्यामध्ये म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी अंतर्गत तिन्ही कंपनी मधील कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधीमधून रु. २०,०००/- ऐवजी रु. ४०,०००/- आर्थिक मदत मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णय संदर्भ क्र. ०२ वरील परिपत्रकान्वये प्रसारित करण्यात आला आहे.

**म.रा.वि.मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५६व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांस अनुसरुन, उपरोक्त ०४ प्रमुख आजारांसाठी कंपनीकडून देण्यात येणाऱ्या रु. १०,०००/- आर्थिक मदतीमध्ये वाढ करुन, ती रु. २०,०००/- करण्याबाबतच्या प्रस्तावास सक्षम अधिकारी म्हणजेच मा. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) तसेच कार्यकारी संचालक (मासं) यांचेशी विचारविनियम करुन मंजूरी प्रदान केली आहे.**

संदर्भ क्र. ०२ वरील परिपत्रकान्वये प्रसारित केल्यानुसार म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीमधून कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना, ०४ प्रमुख आजारांसाठी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीची रक्कम रु. ४०,०००/- करण्यात आलेली असल्याने, वरीलप्रमाणे कंपनीकडून देण्यात येणाऱ्या

आर्थिक मदतीची रक्कम रु. २०,०००/- मिळून कर्मचारी अवलंबितांना, यापुढे ०४ प्रमुख आजारांसाठी **दोन्ही मिळून, रु. ६०,०००/- (रु. साठ हजार मात्र)** किंवा आजारासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम आर्थिक मदत म्हणून देण्यात येईल.

**सदर निर्णयांची अमलबजावणी संदर्भ क्र. ०२ वरील परिपत्रक प्रसारीत झालेल्या तारखेपासून म्हणजे दि. १७/०८/२०१३ पासून करण्यात येईल.**

किशोर पवार

(किशोर पवार)
सदस्य / सचिव, म.रा.वि.मं. क.क.नि.स तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

**प्रत सविनय सादर :**

१) अध्यक्ष, म.रा.वि.मं. क.क.नि. समिती तथा संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई.
२) संचालक (वित्त), म.रा.वि.वितरण कं.मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.
३) कार्यकारी संचालक (मासं), म.रा.वि.वितरण कं.मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत :**

महावितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.